**महानगरपालिका, नगर परिषदा / नगर पंचायती निवडणुकांमध्ये बॅलेट युनिटवरील "End" बटनाच्या वापराबाबत...**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-मनप-२०११ / प्र.क्र. २१ / का-०५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- ५ डिसेंबर, २०११**

## आ दे श

महाराष्ट्रातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर करण्यासंबंधीचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्रमांक-मनप-२००४/प्र.क्र.२/का-०६, दिनांक-१३ एप्रिल, २००४ व क्रमांक-रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.१३/का-५, दिनांक- ७ जानेवारी, २००५ अन्वये निर्गमित केले आहेत.

२. राज्य निवडणूक आयोगाने घेतलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात एकापेक्षा अधिक मते देण्याची सोय असून एकच कंट्रोल युनिट वापरून एकापेक्षा जास्त पदांसाठी मते देता येतात.

३. बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता इतर महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय पध्दत अंमलात आल्यामुळे क्रमांक-मनप-२००४/प्र.क्र.३८/का-०६ दिनांक-२५ फेब्रुवारी, २००५ अन्वये मतदान यंत्राच्या बॅलेट युनिटवरील **"End"** बटनाचा वापर करण्याबाबत सूचना सुधारित करणे आवश्यक आहे.

४. ज्या महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये दोन अथवा अधिक पदांसाठी मतदान करावयाचे असेल तेथे **"End"** बटन वापरावयाचे आहे. जेथे एकापेक्षा जास्त बॅलेट युनिटचा वापर होत असेल तेथे शेवटच्या बॅलेट युनिटवरील **"End"** बटन उघडून **(Unmask)** ठेवण्यात यावे मात्र इतर बॅलेट युनिटवरील **"End"** बटन व्हाईट मास्कींग टॅबने बंद ठेवण्यात यावे. शेवटच्या बॅलेट युनिटवरील **"End"** बटन जरी उघडे असले तरी त्यावर काळी कॅप लावून ठेवावी. साधारणपणे मतदाराकडून सर्व पदांसाठी मतदान केल्यावर **"End"** बटनाचा वापर करण्याची आवश्यकता नाही. जेथे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र एकापेक्षा अधिक मतांसाठी सेट केले असेल तेथे अपवादात्मक परिस्थितीमध्ये जर एखादया मतदाराने त्या पदांपैकी एका पदाकरिता किंवा कोणत्याही पदासाठी मतदान केले नाही व मतदार मतदान कक्षामधून बाहेर निघाला तर केंद्राध्यक्षांना ही गोष्ट त्यांच्याकडे असलेल्या **"Control Unit"** वर लाल दिवा न विझल्यामुळे लक्षात येईल व अशावेळी मतदाराने मतदान पूर्ण न केल्यामुळे मतदान यंत्र पुढील मतदारासाठी तयार होणार नाही. अशा परिस्थितीत केंद्राध्यक्षांनी संबंधित मतदाराला त्याचे मतदान पूर्ण न झाल्याबाबतची कल्पना देणे आवश्यक राहील व मतदारास मतदान पूर्ण करण्याबाबत विनंती करावी. जर मतदाराने पुन्हा मतदान कक्षात

जावून सर्व पदांकरिता मतदान नोंदविले तर या बटनाचा वापर करण्याची आवश्यकता भासणार नाही. पण जर मतदारास त्या पदांपैकी एखादया पदासाठी किंवा सर्व पदांकरिता कोणालाही मतदान करावयाचे नसेल तेव्हा त्या मतदारास शेवटच्या बॅलेट युनिटवरील काळी कॅप काढून **"End"** बटन दाबण्याबाबत विनंती करण्यात यावी. जेणेकरुन त्याची मतदानाची प्रक्रिया पूर्ण होईल व केंद्राध्यक्षांकडे असलेल्या **"Control Unit"** वरील लाल दिवा विझून जाईल व इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र पुढील मतदानासाठी तयार करता येईल. त्यानुसार मतदार तयार असल्यास त्याला मतदानानंतर काळी कॅप पुन्हा **"End"** बटनावर लावण्याच्या सूचना दयाव्यात. **"End"** बटनावरील काळी कॅप योग्यरीत्या लावली आहे याची खात्री मतदान केंद्राध्यक्षांनी वेळोवेळी करून घ्यावी. अपवादात्मक प्रकरणापैकी कधी एखादा मतदार **"End"** बटन दाबण्यासाठी नकार देईल तेव्हा मतदान केंद्राध्यक्षांनी बॅलेट युनिटवरील उमेदवारांचे दिवे एखादा पुठ्ठा अथवा पुस्तक ठेवून झाकावेत व त्यानंतर केंद्रात उपस्थित असलेल्या सर्व मतदान प्रतिनिधींना बरोबर घेवून त्यांच्या साक्षीने **"End"** बटन दाबावे. याबाबतची योग्य ती नोंद मतदान केंद्राध्यक्षांच्या डायरीमध्ये घ्यावी.

५. काही परीस्थितीत मतदार मतदान केंद्राध्यक्षांच्या अपरोक्ष **"End"** बटन वापरण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक जागानिहाय झालेल्या मतदानाची आकडेवारी निकालाच्यावेळीच मतदान यंत्रावर दिसून येईल.

७. महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये पोटनिवडणुका होतात त्यावेळी जर एकच मत दयावयाचे असेल तर **"End"** बटनाला झाकून (**Masked**) ठेवावे.

८. वरील परिच्छेद क्रमांक-४ मध्ये स्पष्ट केल्याव्यतिरिक्त **"End"** बटन अन्य प्रयोजनांसाठी वापरण्यात येऊ नये.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

धमाकानेड

**(ध.मा.कानेड)**
**अवर सचिव**
**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

प्रति,

सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
निवड नस्ती

E:\ATUL PEN DRIVE\Corporation\evm use order.doc